**L. A. BILL No. XXII OF 2024.**

A BILL

TO PROVIDE FOR TEMPORARY POSTPONEMENT OF ELECTIONS OF THE PRESIDENT, VICE-PRESIDENT AND CHAIRMEN OF THE SUBJECTS COMMITTEES OF CERTAIN ZILLA PARISHADS AND THE CHAIRMAN AND DEPUTY CHAIRMAN OF CERTAIN PANCHAYAT SAMITIS ON ACCOUNT OF ENSUING GENERAL ELECTIONS TO THE STATE LEGISLATIVE ASSEMBLY.

**सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२.**

**राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती या पदांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक, २०२४ च्या नोव्हेंबर महिन्यात घेतली जाण्याची शक्यता होती ;

**आणि ज्याअर्थी,** विवक्षित जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती यांचा पदावधी हा ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०२४ मध्ये समाप्त होत होता ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांमुळे, सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालयांतील कर्मचारीवर्ग तसेच जिल्ह्यांतील पोलीस कर्मचारी वर्ग महाराष्ट्र विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीच्या कामामध्ये सक्रिय असणार होते आणि तसेच ते निवडणुकपूर्व आणि निवडणुकीनंतरच्या कर्तव्यांमध्ये व्यग्र असणार होते ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त निवडणुकांची कोणतीही संभाव्य परस्परव्याप्ती आणि नागरी व पोलीस प्रशासनावरील कोणताही संभाव्य अवास्तव ताण आणि कोणतीही कायदा व सुव्यवस्थेची समस्या किंवा नागरिकांची तसेच उमेदवारांची आणि संबंधित मतदारांची गैरसोय टाळण्यासाठी, विवक्षित जिल्हापरिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती या पदांच्या निवडणुका तीन महिन्यांच्या कालावधीसाठी तात्पुरत्या पुढे ढकलणे इष्ट वाटले ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त प्रयोजनांसाठी, विवक्षित जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती या पदांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती पदांच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे अध्यादेश, २०२४, हा प्रख्यापित केला होता ; २०२४ चा महा. अध्या. ११.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्यांच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती पदांच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे अधिनियम, २०२४ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. **२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,–

(क) " पंचायत समिती " याचा अर्थ, जिल्हा परिषद अधिनियमाअन्वये घटित केलेली पंचायत समिती, असा आहे ;

(ख) " जिल्हा परिषद" याचा अर्थ, जिल्हा परिषद अधिनियमाअन्वये घटित केलेली जिल्हा परिषद, असा आहे ;

(ग) " जिल्हा परिषद अधिनियम " याचा अर्थ, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ असा आहे ; १९६२ चा महा. ५.

(घ) या अध्यादेशात वापरलेले आणि यामध्ये व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, कोणत्याही जिल्हा परिषदेच्या किंवा पंचायत समितीच्या संबंधात, जिल्हा परिषद अधिनियमामध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल, तोच अर्थ असेल.

*अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समिती सभापती व उप सभापती पदांच्या निवडणुका पुढे ढकलणे आणि त्यांचा पदावधी वाढविणे.*

**३.** (१) जिल्हा परिषद अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम किंवा कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,–

(क) जिल्हा परिषदेच्या किंवा यथास्थिती, पंचायत समितीच्या विद्यमान मुदतीची अडीच वर्षे संपल्यानंतर, हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या कालावधीत किंवा राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा, अगोदरच्या दिनांकापर्यंत (या अधिनियमात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त कालावधी" असा करण्यात आला आहे) अशा जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती या पदांची कोणतीही निवडणूक घेण्यात येणार नाही ;

(ख) उक्त कालावधीनंतर, निवडून आलेले जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती यांचा पदावधी, निवडून आलेल्या परिषद सदस्यांच्या किंवा, यथास्थिती, सदस्यांच्या पदावधीबरोबर समाप्त होईल.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती यांचा, या अधिनियमाद्वारे वाढविलेला पदावधी समाप्त झाल्यानंतरही, ते जिल्हा परिषद अधिनियमाअन्वये जिल्हा परिषदांचे नवीन अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती, निवडून येईपर्यंत, पद धारण करणे चालू ठेवतील.

*ज्यांचा पदावधी वाढविण्यात आला असेल असे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती, उप सभापती आणि विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती यांचे अधिकार आणि विवक्षित कृतीचे विधिग्राह्यीकरण.*

**४.** ज्यांचा कालावधी कलम ३ अन्वये वाढविण्यात आला असेल किंवा यथास्थिती, वाढविण्यात आला असल्याचे मानण्यात आले असेल, असे जिल्हा परिषदांचे सर्व अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती, वाढविण्यात आलेल्या संपूर्ण कालावधीत, जिल्हा परिषदांचे असे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती म्हणून सर्व अधिकारांचा वापर करण्यास, सर्व कर्तव्यांचे पालन करण्यास व सर्व कामे पार पाडण्यास सक्षम असल्याचे मानण्यात येईल आणि त्याकरिता ते सक्षम असतील ; आणि उक्त कालावधीमध्ये त्यांच्यापैकी कोणीही केलेली कोणतीही कृती, अवैध ठरणार नाही, किंवा अशा वाढविण्यात आलेल्या कालावधीत, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती यांना, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती यांच्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करता आला नाही किंवा सर्व किंवा कोणत्याही कर्तव्याचे पालन करता आले नाही किंवा सर्व किंवा कोणतीही कामे पार पाडता आली नाहीत, केवळ एवढ्याच कारणावरून ती कृती अवैध ठरणार नाही किंवा त्या कृतीस कोणत्याही न्यायालयात आव्हान देण्यात येणार नाही.

*जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती यांच्या निवडणुका घेण्याची व्यवस्था करणे.*

**५.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, या अध्यादेशाद्वारे, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती यांचा वाढवून दिलेला पदावधी संपण्यापूर्वी किंवा तो संपल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, जिल्हा परिषद अधिनियमाच्या तरतुदीनुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमानुसार, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती यांच्या निवडणुका संबंधित जिल्हाधिकारी किंवा इतर अधिकारी यांच्याकडून घेण्याची व्यवस्था करण्यात येईल.

अडचण दूर करण्याचा अधिकार.

**६.** या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना किंवा त्यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात, जिल्हा परिषद अधिनियम अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरुप, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

शंका दूर करणे.

**७.** शंका दूर करण्यासाठी, याद्वारे, असे घोषित करण्यात येते की, या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, जिल्हा परिषदेच्या आणि, यथास्थिती, पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर तात्काळ घ्यावयाच्या जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती पदांच्या निवडणुकीच्या बाबतीत लागू होणार नाही.

सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ यांचे निरसन व व्यावृत्ती.

२०२४ चा महा. अध्या. ११.

**८.** (१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित जिल्हा क्रमांक परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती पदांच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे अध्यादेश, २०२४ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही ही, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ ( सन १९६२ चा महा. ५ ) याच्या विद्यमान तरतुदींनुसार, राज्यातील, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती यांचा पदावधी अडीच वर्षे इतका आहे. काही जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमधील, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती यांचा पदावधी ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०२४ मध्ये संपणार होता.

२. राज्य विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक, २०२४ च्या नोव्हेंबर महिन्यात होण्याची शक्यता होती. महाराष्ट्र विधानसभेच्या उक्त सार्वत्रिक निवडणुकीमुळे, सर्व जिल्हाधिकारी व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारीवर्ग तसेच जिल्ह्यांतील पोलीस कर्मचारीवर्ग उक्त सार्वत्रिक निवडणुकीच्या तयारीच्या कामामध्ये व्यग्र असणार होते, तसेच ते निवडणुकपूर्व आणि निवडणुकीनंतरच्या कामात पूर्णपणे व्यग्र असणार होते. उक्त निवडणुकांची कोणतीही संभाव्य परस्परव्याप्ती टाळण्यासाठी, आणि नागरी व पोलीस प्रशासनावरील कोणताही अवाजवी ताण व कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न किंवा नागरिकांची तसेच उमेदवारांची व संबंधित मतदारांची कोणतीही गैरसोय टाळण्यासाठी, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती यांच्या निवडणुका नव्वद दिवसांच्या कालावधीसाठी तात्पुरत्या पुढे ढकलणे इष्ट वाटले.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीमुळे, विवक्षित जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती या पदांच्या निवडणुका तात्पुरत्या लांबणीवर टाकण्यासाठी आणि इतर विवक्षित अनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती ( राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती पदांच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे अध्यादेश, २०२४ ( २०२४ चा महा. अध्या. ११ ), हा प्रख्यापित केला होता.

४. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा होतू आहे.

नागपूर, **देवेंद्र फडणवीस,**

दिनांक १५ डिसेंबर, २०२४. मुख्यमंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड ३(१)**.— हा अधिनियम, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या कालावधीकरिता अंमलात असणार आहे. तथापि, हा अधिनियम अंमलात असण्याचा कालावधी, आवश्यकता भासल्यास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कमी करण्याचा अधिकार, या खंडान्वये, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ६**. या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना उद्‌भवणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी, **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून, कारवाई करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वरील प्रस्ताव हे सामान्य स्वरूपाचे आहेत.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २२.]**

**[ राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व त्यांच्या विषय समित्यांचे सभापती आणि विवक्षित पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती या पदांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्याकरिता विधेयक.]**

**[ श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

एचबी- २३४५-२

शासकीय मुद्रणालय, नागपूर.